# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 03/06/2017 रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती विशेष सभेचे इतिवृत्त.

शनिवार दिनांक 03 जुन 2017 रोजी (का.प.क्र.01) मा.पीठासीन अधिकारी श्री.नवल किशोर राम भा.प्र.से., जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची विशेष सभा महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 10.05 वा. वंदेमातरम् या गीताने सूरू झाली. सभेला नगर सचिव श्री.डी.डी.सुर्यवंशी यांच्यासह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स्थायी समितीचे स. सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | स.सदस्यांचे नांव |
|---|---|
| 1. | श्री.सिताराम इसराम सुरे |
| 2. | श्री.राजगौरव हरीदास वानखेडे |
| 3. | श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे |
| 4. | श्री.अजिम अहेमद रफीक |
| 5. | श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 6. | श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 7. | श्री.सय्यद मतीन रशीद |
| 8. | श्रीमती शेख नरगीस सलीम |
| 9. | श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| 10. | श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| 11. | श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| 12. | श्री.वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत |
| 13. | श्री.सिध्दांत संजय शिरसाट |
| 14. | श्रीमती राखी प्रशांत देसरडा |
| 15. | श्री.गजानन रामकिसन बारवाल |

**विषय क्र.1 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 21(1) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये स्थायी समिती सभापती पदावर निवड करणे.

मा.पीठासीन अधिकारी :दिनांक 02.06.2017 रोजी नामनिर्देशनपत्र स्विकारणेची कार्यवाही पूर्ण झाली असून दिनांक 02/06/2017 रोजी दिलेल्या वेळेत म्हणजेच दुपारी 3.00 वाजेपर्यंत **स्थायी समिती सभापती** पदासाठी खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली आहेत.

1. श्री.अजीम अहेमद रफिक (दोन नामनिर्देशन पत्र)
2. श्री.गजानन रामकिसन बारवाल

* (नगर सचिव हे **स्थायी समिती सभापती** पदासाठी प्राप्त झालेले नामनिर्देशन पत्र छाननीसाठी पीठासीन अधिकारी यांचेकडे सुपूर्द करतात.)

मा.पीठासीन अधिकारी :मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये चे नियम क्र.5(2) अन्वये **सभापती स्थायी समिती** पदासाठी आता प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येत आहे.

(मा.पीठासीन अधिकारी हे उपजिल्हाधिकारी यांच्या मदतीने छाननी करतात).

| **अ क्र** | **उमेदवाराचे नांव श्री./श्रीमती** | **सूचकाचे नांव श्री./श्रीमती** | **अनुमोदकाचे नांव श्री./श्रीमती** |
|---|---|---|---|
| 1 | अजिम अहेमद रफिक | संगिता सुभाष वाघुले | शेख नरगीस सलीम |
| 2 | अजिम अहेमद रफिक | शेख नरगीस सलीम | सय्यद मतीन रशीद |
| 3 | गजानन रामकिसन बारवाल | मनिषा बाळासाहेब मुंढे | किर्ती महेंद्र शिंदे |

**स्थायी समिती सभापती** पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्रांच्या छाननीचे/तपासणीचे काम पूर्ण झाले असून खालीलप्रमाणे नामनिर्देशन पत्र वैध ठरलेले आहे.

1. श्री.अजिम अहेमद रफिक
2. श्री.गजानन रामकिसन बारवाल

छाननीत वैध ठरलेल्या नामनिर्देशनातून उमेदवारास नामनिर्देशनपत्र/ उमेदवारी परत घ्यावयाचे असल्यास त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये चे नियम क्र.5(3) अन्वये 15 मिनिटांच्या आत उमेदवाराने सही केलेली लेखी सूचना पीठासीन अधिकारी यांना देवून त्यांना आपली उमेदवारी मागे घेता येईल. आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे 10.15 वाजले असून 10.30 वाजेपर्यंत उमेदवारी मागे घेता येईल. तसेच नियम क्र.5(4) अन्वये उमेदवारी मागे घेण्याची नोटीस दिल्यानंतर ती नोटीस रद्द करता येणार नाही.

मा.पीठासीन अधिकारी :आता सभागृहातील घड्याळाप्रमाणे 10.30 वाजले असून **स्थायी समिती सभापती** पदासाठी दोन उमेदवारापैकी विहित मुदतीत खालील उमेदवारांनी स्वत:ची सही करून पीठासीन अधिकारी यांना लेखी सूचना देवून आपले नामनिर्देशन/उमेदवारी अर्ज परत घेतले नाही.

**स्थायी समिती सभापती** पदासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती, आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वयेचे नियम क्र.6(2) नुसार प्राप्त नामनिर्देशनावरील नावांच्या मराठी वर्णानुक्रमाने लावण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहेत.

1. श्री.अजिम अहेमद रफिक
2. श्री.गजानन रामकिसन बारवाल

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती पदाच्या निवडणूका घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये चे नियम क्र.6(3) प्रमाणे हात वर करून मतांची नोंद घेण्यात येईल. नगर सचिव यांनी मतदान प्रक्रीया संबंधीची माहिती सभागृहास द्यावी.

नगर सचिव :सभापती,स्थायी समिती निवडी संबंधी कार्यपध्दती

मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 चे तरतुदी अन्वये सभापती, पदाच्या मतदान प्रक्रीया व निवडी संबंधी तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

01. नियम 6(1) अन्वये एकच वैध नामनिर्देशन करण्यात आले असेल तर पीठासीन अधिकारी अशा उमेदवाराची रितसर निवड झाल्याचे घोषित करेल.
02. नियम 6(2) अन्वये जर वैध नामनिर्देशित उमेदवारांची संख्या एकापेक्षा अधिक असेल, तर पीठासीन अधिकारी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची नांवे वर्णानुक्रमे लावतील.
03. नियम क्र.6(3) अन्वये उमेदवारांचे नांव वर्णानुक्रमाने पुकारण्यात येईल.ज्यांचे नांव पुकारण्यात येईल,त्यांचेसाठी प्रथम हात वर करून मतदान घेण्यात येईल व त्यांना मिळालेल्या मतांची नोंद घेण्यात येईल व त्यांनी ज्या उमेदवाराच्या बाजुने मत दिले आहे, अशा स्थायी समिती सदस्यांचे नांवाची नोंद कार्यवृत्तांतात नोंदविण्यात येईल.
04. नियम क्र.6(4) (एक) अन्वये मत देण्यास इच्छूक असलेल्या प्रत्येक सदस्यास आपले मत देण्यासाठी रास्त व वाजवी संधी मा.पीठासीन अधिकारी देतील.
05. नियम क्र.6(4) (दोन) अन्वये ज्यांचे मत एकदा नोंदविण्यात आले आहे, अशा सदस्यास पुन्हा मत देण्याची किंवा आपले मत बदलण्याची मुभा असणार नाही.
06. नियम क्र.6(5) अन्वये ज्या सदस्यांनी मतदान केलेले नाही, त्यांची नोंद देखिल कार्यवृत्तांतात घेण्यात येईल.
07. नियम 6(7) अन्वये निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला मतदानाद्वारे मिळालेल्या मतांची संख्या पीठासीन अधिकारी घोषित करतील व ज्या उमेदवाराला मतदानात जास्त मते पडतील, तो उमेदवार रितसर निवडूण आल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.
08. नियम क्र. 6(8) अन्वये मते समसमान मिळाल्यास पीठासीन अधिकारी असे घोषित करील की, निवडणुकीचा निकाल चिठ्ठ्या टाकून सोडतीद्वारे ठरविण्यात येईल. उपस्थित आणि मत देण्यास हक्कदार असलेले स्थायी समिती सदस्य बहुसंख्येने ठरवतील अशा व्यक्तीकडून चिठ्ठी काढण्यात येईल.
09. नियम क्र. 6(9) अन्वये ज्या उमेदवाराच्या नांवाची चिठ्ठी निघेल तो उमेदवार उक्त पदावर वैध रीतीने निवडून आला असल्याचे पीठासीन अधिकारी घोषित करतील.

पीठासीन अधिकारी :आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.

1) श्री.अजीम अहेमद रफिक

यांना **सभापती,स्थायी समिती पदासाठी** ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.अजीम अहेमद रफिक यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| 01. | श्री.अजीम अहेमद रफिक |
| 02. | श्री.सय्यद मतीन रशीद |
| 03. | श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 04. | श्रीमती शेख नरगीस सलीम |

आता वर्णानुक्रमाने उमेदवारांचे नांव घोषित करण्यात येत आहेत.

2) श्री.गजानन रामकिसन बारवाल

यांना सभापती,स्थायी समिती पदासाठी ज्यांना मते द्यावयाची आहेत, त्यांनी आपले हात वर करून मत नोंदवावे मतगणना अधिकारी यांनी कृपया ज्यांनी ज्यांनी श्री.गजानन रामकिसन बारवाल यांना हात वर करून मतदान करित आहे, त्यांची नांवे लिहून घ्यावी व आपले स्वाक्षरीसह ती यादी माझेकडे सादर करावी. तसेच मतदान नोंदवितांना मतगणना अधिकारी यांनी मतदारांचे व्हिडीओ चित्रीकरण होईल,याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र | हात वर करून मतदान करणाऱ्या स.सदस्यांची नांवे |
|---|---|
| 01. | श्री.गजानन रामकिसन बारवाल |
| 02. | श्री.सीताराम इसराम सुरे |
| 03. | श्री.वाघमारे रुपचंद लक्ष्मण |
| 04. | श्री.खैरे ऋषिकेश चंद्रकांत |
| 05. | श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 06. | श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 07. | श्री.वैद्य रेणुकादास (राजू) दत्तोपंत |
| 08. | श्री.सिध्दांत संजय शिरसाट |
| 09. | श्रीमती स्वाती किशोर नागरे |
| 10. | श्रीमती राखी प्रशांत देसरडा |
| 11. | श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंढे |

एकूण हजर असलेल्या **स्थायी समिती** सदस्यांची संख्या -15

मतदानात भाग घेतलेल्या **स्थायी समिती** सदस्यांची संख्या -15

मतदानात भाग न घेतलेल्या **स्थायी समिती** सदस्यांची संख्या -निरंक

उमेदवारांना मिळालेली मते

(मतांच्या संख्येनुसार चढत्या क्रमांकाने उमेदवारांची यादी)

01. श्री.अजीम अहेमद रफिक - (04)

02. श्री.गजानन रामकिसन बारवाल - (11)

वरीलप्रमाणे झालेल्या मतदानात स्थायी समिती सभापती पदासाठी **श्री.गजानन रामकिसन बारवाल** यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 21(1) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका

(स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये वैध रितीने निवड झाल्याचे याद्वारे घोषित करण्यात येते.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या मतदानानुसार स्थायी समिती सभापती पदासाठी **श्री.गजानन रामकिसन बारवाल** यांना सर्वात जास्त मते मिळालेली आहेत. त्यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 21 (1) आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थायी समिती,परिवहन समिती, प्रभाग समिती आणि इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे) नियम 2007 व (सुधारणा) नियम 2008 (सुधारणा) नियम 2010 अन्वये **श्री.गजानन रामकिसन बारवाल** यांची स्थायी समिती सभापती पदावर बहुमताने झालेल्या निवडीस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच सभा संपल्याचे पीठासीन अधिकारी यांनी घोषित केले.

**(दिलीप दत्तात्रय सुर्यवंशी)**
नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद